संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

## विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांचा १ मे रोजी गौरव
## सर्व संबंधितांकडून अर्ज आमंत्रित

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ व पर्यायाने महाविद्यालयांना उत्कृष्ट सेवा देणाऱ्या प्राचार्य, संचालक, शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार देवून दरवर्षी १ मे रोजी गौरविल्या जाते. यावर्षी सुद्धा १ मे, २०१९ रोजी उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार देवून त्यांचा यथोचित गौरव केल्या जाणार आहे. प्रमाणपत्र, शॉल व श्रीफळ आणि १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक असे पुरस्काराचे स्वरुप आहे. या पुरस्काराकरीता आवेदनपत्र सादर करण्याची अंतीम तारीख ३१ मार्च, २०१९ आहे. तरी याची सर्व संबंधितांना नोंद घ्यावयाची असून दिनांक ३१ मार्च, २०१९ नंतर प्राप्त होणारे अर्ज कुठल्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

विद्यापीठातील शिक्षक, प्रथम श्रेणी अधिकारी, द्वितीय श्रेणी अधिकारी, तृतीय श्रेणी कर्मचारी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी या वर्गवारीत, तर संलग्नित महाविद्यालयांमधून प्राचार्य, संचालक, शिक्षक आणि सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी या वर्गवारीत पुरस्कार प्रदान केले जातात. या संदर्भात सविस्तर माहिती व अर्ज विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सर्व महाविद्यालयांना व विभागप्रमुखांना पत्र पाठवून विद्यापीठाच्या आस्थापना विभागाने कळविले आहे.

अधिक माहितीसाठी आस्थापना विभागाचे उपकुलसचिव श्री प्रवीण राठोड यांचेशी संपर्क साधता येईल. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी व आपले आवेदनपत्र विहित मुदतीत सादर करावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने प्रभारी कुलसचिव डॉ. हेमंत देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०२/०३/२०१९.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी